महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ४२ वे | दिनांक : ०२/०२/२०२६ वार : सोमवार

## पार्थ पवारांना खासदार करू नका, त्यांच्यावर गुन्हा दाखल करा - अंजली दमानिया



**पुणे** : सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पुणे भूखंड घोटाळ्याप्रकरणी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. अजित पवारांच्या निधनानंतर अवघ्या ३ दिवसांत शपथविधी घ्यायला हरकत नसेल, तर पुणे भूखंड घोटाळ्याची चौकशीही थांबवायची नाही, असे त्या म्हणाल्यात. धनंजय मुंडेसारखा संधीसाधू माणूस सुनेत्रा पवारांच्या मागेपुढे फिरताना दिसल्याची बाबही त्यांनी यावेळी निदर्शनास आणून दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गत बुधवारी विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर अवघ्या ३ दिवसांतच त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली. या प्रकरणी सकारात्मक व नकारात्मक या दोन्ही प्रकारच्या चर्चा होताना दिसून येत आहेत. या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी पार्थ पवार यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. त्या रविवारी एका पोस्टमध्ये म्हणाल्या, अजित पवारांच्या निधनानंतर अवघ्या 3 दिवसांत शपथविधी घ्यायला काहीच हरकत नसेल आणि "बिझनेस अज यूज्युअल" असेल, तर पुणे जमीन घोटाळ्याची चौकशीही थांबवायची नाही.

अंजली दमानिया यांनी यावेळी सुनेत्रा पवारांच्या मागे संधीसाधू नेते मागेपुढे करत असल्याचाही आरोप केला आहे. या प्रकरणी त्यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला. धनंजय मुंडेही सुनेत्रा पवारांच्या पुढे मागे फिरताना दिसले. संधीसाधू माणूस. परत येण्याची तडफड दिसतेय, असे त्या म्हणाल्या. धनंजय मुंडे यांना संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. या प्रकरणात धनंजय मुंडे यांचा उजवा हात मानल्या जाणाऱ्या वाल्मीक कराडला अटक करण्यात आली आहे.

## मुंबई महानगरपालिकेत राष्ट्रवादीने भाजपला डावलून शिंदे सेनेला दिला पाठिंबा





**मुंबई** : महानगरपालिका निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने एक महत्त्वपूर्ण राजकीय पाऊल उचलले असून, महापालिकेत आपल्या तीन नगरसेवकांचा स्वतंत्र गट नोंदवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. महायुतीचा घटक पक्ष असूनही मुंबईत निर्माण झालेल्या विशेष राजकीय परिस्थितीमुळे राष्ट्रवादीने हा पवित्रा घेतला आहे. या निर्णयामुळे आता मुंबई महापालिकेत सत्तेच्या समीकरणात राष्ट्रवादीचा हा गट शिंदेंच्या शिवसेनेसोबत सक्रिय राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या राजकीय भूमिकेमागे निवडणुकीपूर्वीचे नाट्यमय संदर्भ आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपने नवाब मलिक यांच्या नावावरून घेतलेल्या आक्षेपामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला महायुतीमध्ये स्थान मिळण्यास अडचणी आल्या होत्या. परिणामी, राष्ट्रवादीला मुंबईत स्वतंत्रपणे निवडणूक लढवावी लागली होती. निवडणुकीनंतर मात्र, राष्ट्रवादीने भाजपला पाठिंबा न देता थेट शिंदेंच्या शिवसेनेला साथ देण्याचे ठरवले आहे. भाजपच्या विरोधामुळे निर्माण झालेली दरी आणि स्थानिक राजकारणाची गरज यातून हा निर्णय घेतल्याचे मानले जात आहे.

या पाठिंब्याच्या बदल्यात राष्ट्रवादी काँग्रेसला महापालिकेच्या विविध वैधानिक आणि विशेष समित्यांमध्ये मानाचे स्थान मिळण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिवसेनेने राष्ट्रवादीला समित्यांमध्ये प्रतिनिधित्व देण्याचे आश्वासन दिले असून, त्या बदल्यात हे तीन नगरसेवक शिवसेनेच्या पाठीशी उभे राहणार आहेत. यामुळे मुंबई महापालिकेत भाजप-शिवसेना युतीची सत्ता येणार असली, तरी राष्ट्रवादीच्या पाठिंब्यामुळे महापालिकेत शिंदेंच्या शिवसेनेची ताकद आणि सौदेबाजीची क्षमता अधिक वाढणार आहे.

एकनाथ शिंदे हा शब्दाचा पक्का आहे, लाडक्या बहिणींना लखपती केल्याशिवाय थांबणार नाही. लवकरच आम्ही लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार, असे विधान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. कोल्हापूरच्या कागल येथे एका जाहीर सभेत ते बोलत होते. ज्या उमेदवाराच्या मागे महिला, त्याचा मत पेटीत नंबर पहिला. त्यामुळे दर महिन्याला ओवाळणी देणारा हा भाऊ आज विनंती करायला आला असल्याचे यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले

## अजितदादा जवळजवळ सर्वच गोष्टी माझ्याशी बोलायचे - देवेंद्र फडणवीस



**मंबई** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेने राज्याच्या राजकारणात मोठे वादळ निर्माण केले आहे. "दोन्ही पक्ष 12 फेब्रुवारीला एकत्र येणार होते," या शरद पवार आणि जयंत पाटील यांचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खोडून काढला आहे. "अजित पवार भाजपशी चर्चा केल्याशिवाय विलीनीकरणाचा निर्णय घेतील का?" असा थेट सवाल करत, राष्ट्रवादीने असा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी भाजपशी चर्चा करणे आवश्यक असल्याची 'अट' मुख्यमंत्र्यांनी घातली आहे.

शरद पवार गटाकडून असा दावा केला जात आहे की, अजित पवार स्वतः विलीनीकरणासाठी आग्रही होते आणि त्यासाठी अनेक गुप्त बैठकाही झाल्या होत्या. यावर भाष्य करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "जर चर्चा अंतिम टप्प्यात असती आणि 12 फेब्रुवारी ही तारीख निश्चित झाली असती, तर अजितदादांनी आम्हाला नक्कीच कळवले असते. अशा कोणत्याही तारखेची माहिती आम्हाला नाही. अजित पवार आणि मी तासनतास चर्चा करत बसलो होतो. अजितदादा जवळजवळ सर्वच गोष्टी माझ्याशी बोलायचे. पण त्यांनी विलीनीकरणाबाबत असा कोणताही शब्द काढला नाही."
मुख्यमंत्री फडणवीसांनी यावेळी एक महत्त्वाचा तांत्रिक प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले,

"अजित पवार अशी चर्चा करत होते, तर ते सरकारमधून बाहेर पडण्यासाठी करत होते का? मी यावर अनेक गोष्टी सांगू शकतो, पण सध्या मला त्यावर बोलायचे नाही."
सध्या अजित पवारांची राष्ट्रवादी महायुतीमध्ये सत्तेत आहे, तर शरद पवारांची राष्ट्रवादी विरोधात आहे. अशा स्थितीत विलीनीकरण झाले तर सत्तेचे समीकरण बदलू शकते, याकडेच मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "सुनेत्रा वहिनींनी पक्षाचे नेतृत्व करावे हा त्यांचा अंतर्गत निर्णय आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतलेल्या या निर्णयासोबत खंबीरपणे उभे राहणे हे महायुतीचा धर्म म्हणून आमचे काम आहे."

दरम्यान, अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे यांनीही याआधी शरद पवार गटाचा दावा खोडून काढला आहे. "बारामती येथे झालेली बैठक ही विलीनीकरणासाठी नव्हती, तर केवळ जिल्हा परिषद निवडणुका एकत्र लढवण्याबाबत होती," असे सांगत त्यांनी शरद पवारांचा एकत्रीकरणाचा दावा फेटाळून लावला आहे. यामुळे दोन्ही बाजूंकडून परस्परविरोधी विधाने समोर येत आहेत.

दरम्यान, अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष सध्या भाजपा आणि शिंदे यांच्या शिवसेनेसोबत सत्तेत आहे. तर शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष विरोधी बाकावर आहे. त्यामुळे राष्ट्रवादीचे विलीनीकरण करायचे असेल तर शरद पवार यांच्या पक्षाला सत्तेत सहभागी व्हावे लागेल किंवा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला सत्तेतून बाहेर पडावे लागेल. असे असताना देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पक्षाची भूमिका सांगितल्यानंतर आता पुढे काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०२ फेब्रुवारी २०२६


## शिवपुत्र संभाजी महाराज यांस जगतातील तमाम बहुजन, शिवप्रेमी यांच्याकडून मानाचा मुजरा राजे



महाराज, आज हे पत्र आवर्जून आपल्या सेवेत विनम्रपणे समर्पित करतो आहे. महाराज आपल्या इतिहासाला साडेतीनशे वर्ष पूर्ण होत आहेत. इतक्या प्रदीर्घ कालखंडानंतरही आज प्रत्येक माणसांच्या श्वासासोबत आपण आम्हा बहूजनांच्या,मावळ्यांच्या रोमा रोमा मध्ये संचारत आहात. रयतेसाठी,शिवसम्राज्यासाठी, आपण केलेलं बलिदान आजही आपल्या कार्य कर्तुत्वाची, विचाराची आणि महाराजांनी मिळवलेलं साम्राज्य स्वराज्य स्वराज्य रक्षण करत असताना आपण केलेल्या त्यागाची साम्राज्याची साक्ष देत आहे......अजरामर झालेला आपल्या रक्ताचा थेंब ना थेंब ईथल्या माय भूमीमध्ये पुन्हा पुन्हा रोमांकित होतो आहे. अंकुरतो आहे.फुलतो आहे..फक्त शंभूराजे म्हटलं तरी अंग अंग शहारते आहे.डोळ्याच्या कडान कडा आपसूक ओलावतात.आणि स्पुरन चढते. बाहुबलात रक्तसळसळते संचारते मुठी ओळल्या जातात.कंठातून आकाशाला गवसनी घालणारा बुलंद आवाज बाहेर पडतो. छत्रपती संभाजी महाराज की जय जय जय...महाराज आपल्या जयघोषाने अंबर निनादून जाते. बहीण बाळं कळली नाहीत.सरसकट सत्तेसाठी त्यांची कत्तल करणारा निर्दयी निष्ठूर दगाखोर याच महाराष्ट्रातल्या मातीत इथेच गाडला गेला.मराठ्यांचे साम्राज्य नेस्तनाबूत करतो.अशी शपथ घेतलेला औरंगजेब तो याच मातीतून परत गेलाचं नाही. आणि परतही जाऊ दिला नाही. ह्या मराठ्यांच्या शिवसम्राज्याने औरंग्याचे अस्तित्व समाप्त केलं.आता तेच थडग चुकीची क्षमा मागत आहे राजे.याचना करत आहे. त्यालाही आज चुकीसाठी क्षमा मागायची इच्छा झालीय. राजे आपल्या माहितीसाठी नक्की सांगायला मला आवडेल. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी औरंगाबादचं नाव बदलून छत्रपती संभाजी महाराज या नावाची घोषणा केली होती.आज तेही अस्तित्वात नाहीत.परंतु त्यांची आठवण आल्या वाचून रहात नाही.आज औरंगजेबचे नामोनिशान मिटल आहे. आज प्रत्येक घराघरावरती आपल्या स्मृतीची,आपल्या त्यागाची आठवण म्हणून भगवा झेंडा आकाशाला गवसणी घालतो आहे. उभा हिंदुस्तान भगवामय झालेला आहे.आपला विचार,आपला त्याग,आमच्या रोमारोमा मध्ये भिनला आहे.आज गड किल्लेही छत्रपती संभाजी महाराज की जय ची घोषणा देत आहेत. ते आपल्या कार्य कर्तुत्वाची, आणि त्यागाची साक्ष देत आहेत.राजे आपल्या त्यागाची, बलिदानाची निशाणी अजरामर झाली. राजे आपण दिलेले बलिदान व्यर्थ गेललं नाही.तर ते अजरामर झालं.... जय हो शंभुराजेअजरामर हो शंभूराजे.

**लेखक. भूमीपुत्र वाघ, शिवधर्म प्रचारक महाराष्ट्र**
**९१७२९७२४८२**

## सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयात केंद्रीय अर्थसंकल्पावर रंगल्या बजेट गप्पा



**कन्नड (अरुण थोरात) :** १ फेब्रुवारी २०२६ रोजी देशाचा अर्थसंकल्प संसदेत मांडण्यात आला. केंद्रीय अर्थसंकल्प अर्थात बजेट-२०२६ यावर चर्चा व्हावी आणि यातील बारकावे समजावे या अनुषंगाने सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय आणि बाळासाहेब पवार फाऊंडेशन यांच्या वतीने दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी ११ वाजता बजेट - २०२६ चे थेट प्रक्षेपण आणि बजेट गप्पांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कन्नड शहरातील प्रतिष्ठित उद्योजक, व्यापारी, शेतकरी, नोकरदार आणि विद्यार्थ्यांनी चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. या चर्चेत कन्नड शहरातील एमआरएफ टायर शोरूमचे संचालक श्री. आदिनाथ शिंदे यांनी व्यापाराच्या अनुषंगाने अंदाजपत्रकातील तरतुदींवरती भाष्य केले. तसेच वाढत्या जीएसटी मुळे टायर विक्री व्यावसायिकांना येणाऱ्या अडचणी व्यक्त केल्या. श्री. असिफ शेख यांनी नवउद्योजकांसाठी आवश्यक असणाऱ्या वेगवेगळ्या सुविधा सहजपणे मिळण्यासाठी आवश्यक असणारे घटक सहजपणे मिळाले पाहिजे असे मत व्यक्त केले. यश पाटील यांनी अंदाजपत्रकातील सूक्ष्म, लहान आणि मध्यम उद्योगाच्या संदर्भातील असलेल्या तरतुदीवरती भाष्य केले.प्राध्यापक सोमेश मोगरे यांनी प्रत्यक्षामध्ये रोजगार वाढविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांची अंदाजपत्रकामध्ये कमतरता असल्याचे मत नमूद केले.हर्षल भोसले यांनी शिक्षणासाठी भरीव तरतूद करण्याची आवश्यकता नमूद केली. ग्रंथपाल संतोष देशमुख यांनी लाईव्ह अंदाजपत्रकाचे थेट प्रक्षेपण या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना अंदाजपत्रक सहज समजण्यास मदत होत असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी प्रा. सिताराम मोगल, प्रा. अमोल सरोदे, रोहित क्षीरसागर, रेणुका भिलांगे, संदीप कुलकर्णी, पूजा गोरे, कोमल निकम, पलक भारुका, रोशन राठोड, आकाश राठोड, कृष्णा जाधव, आदीसह विद्यार्थ्यांनी बजेट संदर्भातील चर्चेमध्ये सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नरेश सोनवणे, ऋषिकेश शिवदे, आकांशा श्रीकांत यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मंगेश जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुनिल गोरडे आणि आभार डॉ. राकेश अहिरराव यांनी व्यक्त केले.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


## विद्यार्थ्यांनी आपला मोबाईल बघण्याचा स्क्रीन टाईम ठरवावा जास्त वेळ मोबाईल वापर धोकादायक - प्रा. शिल्पा कहोणा



**जालना (प्रा. राजेंद्र सोनवणे)** : विद्यार्थ्यांनी आपला मोबाईल बघण्याचा स्क्रीन टाईम ठरवावा ६ तासापेक्षा जास्त मोबाईलचा वापर करू नये, मेंदूवर ताण येऊन मानसिक स्वास्थ खराब होऊ शकते. असे प्रतिपादन संगणक व्यवस्थापन विभागाच्या प्रा.शिल्पा कहोना यांनी केले. जेइएस महाविद्यालय जालनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मांडवा येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दि. २९ जानेवारी ते४फेब्रुवारी२०२६ दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. तिसऱ्या दिवशी बौद्धिक क्षेत्रात स्क्रीन टाईम टू ग्रीन टाईम या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी प्रा खलिफा होते. यावेळी व्यासपीठावर प्रा. समाधान पवार प्राध्यापक संतोष नजण त्यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रा. शिल्पा कहोणा म्हणाल्या की , मोबाईल वापरण्याचा सहा तासापेक्षा जास्त वेळ मोबाईल बघू नये नाहीतर मानसिक स्वास्थ खराब होते मेंदू काम करू शकत नाही त्यावर ताण पडतो यामुळे भारतात मानसिक रुग्णांची संख्या वाढलेली आहे. युवकांनी याचा गांभीर्याने विचार करावा यामुळे युवा पिढी चे भविष्य बरबाद होऊ शकते असेही प्रा. कहोने यांनी सांगितले. यावेळी छत्रपती संभाजी नगर, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेश सरकटे प्रा. किशोर तापडिया प्रा. योगेश लहामाटे आदि उपस्थित होते या कार्यक्रमचे सूत्रसंचालन दिपाली दिवेकर यांनी केले. तर आभार नक्षत्रा तांदळे यांनी मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०२ फेब्रुवारी २०२६


## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात बारावी विद्यार्थ्यांचा शुभेच्छा कार्यक्रम उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांचा बारावी बोर्ड परीक्षा शुभेच्छा समारंभ महाविद्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रेरणा देणारा, मार्गदर्शक व भावनिक असा हा कार्यक्रम ठरला. कार्यक्रमाची सुरुवात संगीत विभागाचे प्रा. शंकर विधाते व विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून केली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुनंदा चक्रनारायण मॅडम उपस्थित होत्या. तसेच व्यासपीठावर अंतर्गत मूल्यमापन समितीचे प्रमुख डॉ. प्रभाकर गायकवाड, प्रा. रविंद्र परभणे, प्रा. शरद देशमुख, प्रा. श्याम घोरतळे आणि डॉ. शोभा हनवते यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी अंतर्गत मूल्यमापन परीक्षेत कला, विज्ञान, वाणिज्य व एच.एस.व्ही.सी. या शाखांमधून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.विज्ञान शाखा : श्रुती बुट्टे, प्राची खनपुरिया, रिद्धी हंडेकला शाखा : शेख अलिशा, अक्षरा तांदळे, तनुश्री सरोनेवाणिज्य शाखा : अंजली शिंदे, रिया फुलसौंदर, रिया पांडेएच.एस.व्ही.सी. : दिशा आव्हाड, रुपाली भालेराव, प्रिती तुपेयांचा यावेळी सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करून त्यांना पुढील परीक्षेसाठी प्रेरणा व शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रमात सलोनी गुरुभैय्ये, प्राची खनपुरिया, श्रुती बुट्टे, रिद्धी हंडे, नचिकेत सोनवणे, दिला आव्हाड, अक्षरा तांदळे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी महाविद्यालयातील अनुभव, शिक्षकांचे मार्गदर्शन, मित्रमैत्रिणींचा सहवास तसेच आगामी बोर्ड परीक्षेबाबतची तयारी याविषयी भावना व्यक्त केल्या.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षकांनी बारावी बोर्ड परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. प्रा. श्याम घोरतळे व डॉ. शोभा हनवते यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, “फक्त गुणांसाठी नाही, तर सर्वांगीण विकासासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे. स्वतःची क्षमता ओळखून आत्मविश्वासाने करिअरची दिशा ठरवा. नियमित अभ्यास, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन हाच यशाचा पाया आहे.”प्रा. शरद देशमुख यांनी बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, “वेळेचे योग्य नियोजन करून दररोज अभ्यासाची शिस्त लावा. प्रश्नपत्रिकेचा नमुना समजून घ्या, उत्तरलेखनाचा सराव करा. अभ्यासासोबत योग्य आहार व पुरेशी झोप घ्या. परीक्षेचा ताण येऊ देऊ नका; शांत मनाने व आत्मविश्वासाने पेपर सोडवा.” तसेच घरातील वातावरण अभ्यासपूरक ठेवणे, मोबाईलचा मर्यादित वापर आणि परीक्षेच्या काळात वेळेचे नियोजन याविषयी त्यांनी विविध उदाहरणांद्वारे मार्गदर्शन केले. तसेच प्रा. उमाळकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना बीसीए मधून करियरविषयक संधीबद्दल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी विद्यार्थ्यांना बारावी परीक्षेसाठी शुभेच्छा देत सांगितले की, “महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत करिअर घडवण्यासाठी आवश्यक संधी, शैक्षणिक सोयी व मार्गदर्शन उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी मोठे ध्येय ठेवून सातत्याने मेहनत करावी.”कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ प्रभाकर गायकवाड यांनी, सूत्रसंचालन विद्यार्थिनी गौरी बोर्डे हिने केले. तर आभार प्रदर्शन प्रा. रविंद्र परभणे यांनी केले. याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## भांडण

गरम गरम चहा
करे सर्वांचा हेवा
मीच श्रेष्ठ आहे
उठसूठ करे दावा

दूध म्हणे चहाला
तुला शोभा माझ्यामुळे
माझ्याशिवाय तू काळा
तुला कसे नाही कळे ?

दोघांचे भांडण ऐकून
साखर झाली रागाने वेडी
म्हणे माझ्याशिवाय
कशी येणार गोडी?

कप आणि बशी म्हणे
निरर्थक तुमची गोडी
चहा कसा पिणार ?
जर नसेल आमची जोडी

अग्नी व पातेलं म्हणे
आम्ही सर्वात भारी
आमच्या दोघांशिवाय
फुकट मेहनत सारी!



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि. यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## माळीवाडा येथील मानव विकास संस्थेच्या प्रकल्पाचे सुवर्ण महोत्सव साजरे








**दौलताबाद (जावेद अहेमद) :** माळीवाडा तालुका छत्रपती संभाजीनगर येथे १९७५ ला मानव विकास संस्था( ICR) यांनी गाव सुधारणा करण्यासाठी प्रकल्प सुरू केले होतेत्याला आज पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेया प्रकल्पात काम करणारे जॉन पेटागण कॅनडा,विनोद पारीख नाशिक,मेरी डिसुझा भारत,जान विंगल अमेरिका, धर्मलिंगम मलेशिया,पॉल रायकम इंग्लंड,विनय लोखंडे भारत,गौतम गोसावी,शंकर जाधव भारत,हिरामण गवई तसेच जे हयात नाही त्या व्यक्तीचे कुटुंब सहभागी झाले होते आलेल्या पाहुण्यांचे गावातील लोकांनी जोरदार स्वागत केले महिलांनी औक्षण केले व जिल्हा परिषद शालेय विद्यार्थी नी लेझीम सादर केलेकार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच ज्योती मुळे हे होते आलेल्या पाहुण्यांनी आपले जुने सहकारी पाहून एकमेकांना गळाभेट घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला आपले मनोगत व्यक्त करताना जुन्या आठवणी ताज्या केलीएकमेकांना भेटवस्तू देण्यात आली जॉन व्हिगल व त्याच्या पत्नी जुरी व्हिगल हे शिक्षक म्हणून या प्रकल्पात आले होते त्या वेळी गावातील धोंडीराम जगधने व शंकर देवतकर हे त्यांच्या सोबत काम करत होते जुरी व्हिगल हे गरोदर होत्या त्यांना दोन जुळे मुले झाली जॉन यांनी आपल्या एक मुलाच नावे धोंडीराम तर दुसऱ्या मुलाचे शंकर नावे ठेवली आहे ते दोघे मुले आज जवळपास५०वर्ष व्याचे आहे ते दोन्ही पण येथे आले होतेसंस्थेने गावात त्याकाळी बँक, पोस्ट ऑफिस, शाळा, रस्ते, सॉ मिल,सुकडी कारखाना अशी अनेक साधने उपलब्ध करून दिली होती माळीवाडा हे गाव दौलताबाद किल्ला जवळ असल्याने जगातील कोणी येथे आले तर त्याला हे माहित व्हावे म्हणून या गावाची निवड करण्यात आली होती या प्रकल्पात भारतातील ४५० सदस्य सामील झाले होतेआलेल्या सर्व पाहुण्यांना गाव दाखवण्यात आले यानंतर पुरणपोळी चे जेवण त्यांना देण्यात आले जेवण झाल्यावर त्यांनी समाधान व्यक्त केलेयावेळी उपसरपंच मणेश गाजरे, ग्रामपंचायत सदस्य प्रवीण बर्डे, कडू कीर्तिकर, अनिता सुधाकर हेकडे, कृष्णा मुळे, माजी सरपंच बाबासाहेब मुळे, पर्यटन विभागाचे डॉ . शिवाजी गायकवाड, राम उदावंत, ऍड नंदकिशोर, ढंगारे, ऍड तेजस्विनी आढाव, ग्रामविकास अधिकारी पवार, शाम उदावन्त, लक्ष्मण लक्ष्मण देवतकर, शंकर देवतकर, एफ ऐन तडवी, जि डी चव्हाण, ग्रामपंचायत कर्मचारी, गावातील सर्व ग्रामस्थ, महिला, शिक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०२ फेब्रुवारी २०२६

# अहिराणी, एकूण बोली आणि मराठी- भाग तीन

अहिराणी लोकसंस्कृती वा एकूण बोली भाषांची लोकसंस्कृती म्हणजे नेमकं काय? याबाबत आपण अतिशय वरवरचा विचार करून वर्णनात्मक स्वरूपात मांडणी करत अहिराणी लोकसंस्कृतीचं स्थूल स्वरूप सांगत राहतो. लोकजीवनातल्या ठळक बाबींचा उल्लेख करत 'अमूक अमूक या बाबी' म्हणजे अहिराणी लोकसंस्कृती असं म्हणू लागतो. पण हा विषय आपण समजतो त्यापेक्षा खूप खोल, सूक्ष्म आणि व्यापक आहे, तो मुळातून समजून घेतला पाहिजे. अभिर- अहिर- अहिराणी या सूत्रानुसार अभिर लोकांची भाषा अहिराणी हे आपण कधीच मान्य केलं आहे. आज नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव आणि संभाजीनगरचा काही भाग ह्या जिल्ह्यांत अहिराणी बोलली जात असली तरी अभिर लोक पंजाब, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, गुजराथसह संपूर्ण उत्तर- वायव्य भारतात पसरलेले आहेत, आणि तिकडूनच ते बागलाणात- खान्देशात आले. ज्या त्या स्थानिक गरजेनुसार, ज्या त्या परिवेशातल्या बदलानुसार लोकांची स्थानिक भाषा बदलत गेली. आज विविध प्रांतात (महाराष्ट्राबाहेर) राहणारे अभिर त्या त्या प्रांतीय भाषा बोलतात. पण अशा सगळ्याच अभिरांत (म्हणजे आजच्या बहुजन समाजात) जी जात उतरंड तात्कालीक अभिजन वर्गानं जाणीवपूर्वक लादून बहुजनांचं शोषण सुरु केलेलं दिसतं, ते धर्मसत्तेतून कायमस्वरुपी आजही समाजसत्तेत दिसून येतं. हे शोषण फक्त अभिरांचंच झालं असं मात्र नाही, तर ते संपूर्ण भारतभर, अगदी दक्षिण द्राविड लोकांतही (स्थानिक मूळ रहिवाशांत) पुढं पध्दतशीरपणे होत राहिलं. या विशिष्ट कारस्थानात गुपचूप अनेकसूत्री कार्यक्रम राबवला गेला. यात स्थानिक बोलीभाषा मारणं, अथवा त्या भाषांची अशुध्द, गावठी अशी बदनामी करत त्यांच्या जागी संस्कृत भाषा ग्रंथांतून ठरवून प्रस्थापित- उपयोजित करणं, अथवा त्याच भाषेवर संस्कृतचा मुलामा चढवत प्रमाणभाषा- शुध्द भाषा म्हणून मिरवणं, स्थानिक ग्रामीण लोकदैवते नष्ट करणं, लोकदैवतं नष्ट होत नसतील तर अशा लोकदैवतांच्या भाकड अनैतिक खोट्या कथा- गोष्टी पसरवणं, त्यांचं अस्तित्व भ्रष्ट करणं, त्यांना तामसी म्हणणं, त्यांना अशिष्ट भक्षण करणारे ठरवणं, त्यांच्या मुर्ती विकृत बनवणं (उदा. गणपती आणि इतर बरेच.), अशिष्ट लोकांचे देव अशिष्ट असा प्रचार करणं, इतकं करूनही ते नष्ट होत नसतील तर त्यांचेच व्यापारीकरण सुरू करत त्यांच्याच नावानं व्यवसाय सुरू करणं, पुढं बहुजनांतल्या ऐतिहासिक महापुरूषांबद्दलही हेच धोरण राबवून आडमार्गानं त्यांना कमी लेखण्याची पध्दतशीर भूमिगत चळवळ- कुजबुज मोहीम सुरू ठेवण्यात आली आहे. समाजात आपले वर्गवर्चस्व प्रस्थापित होईल अशी व्यवस्था जाणूनबुजून निर्माण करण्याच्या अनेक गोष्टी विशिष्ट अभिजन वर्गाकडून सतत घडत राहिल्या आहेत, अजूनही होत आहेत. अगदी आधुनिक म्हणता येईल अशा आजच्या काळातही हे राजरोस सुरू आहे. या सगळ्यांचे पडसाद भाषेत पडत राहतात, मग ती शिव्यांची भाषा असो की स्तुतीची. हे सांस्कृतिक थंड यादवी युध्द एकतर्फी असून ते प्रत्येकालाच जाणवत नाही. आपल्या अडाणीपणामुळं वा न्युनगंडामुळं अनेक लोक उच्चभ्रूंचं अनुकरण करत राहतात. असं करण्यात आपण आपल्या मूळ लोकसंस्कृतीशी प्रतारणा करतो हे त्यांच्या लक्षात येत नाही. लोकसंस्कृतीशी फारकत घेत आपल्या भाषेचीही बहुजन वर्ग नाळ तोडू पहातो. आपल्या भाषेला अभिजन लोक अशुध्द, गावढंळ म्हणतात म्हणून बहुजन त्यांच्या भाषेचंही अनुकरण करू लागतो. आपले पारंपरिक कामं करताना वा बदललेली मजूरी करताना आपण इथल्या पारंपरिक व्यवस्थेचे बळी आहोत, हेही त्यांना कळत नाही. काबाडकष्ट करूनही ते दिखाव्याच्या अनुकरणात मस्त असतात. खस्ता खात कमवलेला पैसा, तथाकथित मुक्ती मिळवण्याच्या लालसेनं वा घरबसल्या पुण्याच्या गणनेसाठी, एखाद्या पोथीतून सांगितलेल्या विधीवर दान- दक्षिणेत सहज उधळून देतात. ही लादलेली ऐतखाऊ व्यवस्था स्वानुभवातून ज्यांच्या लक्षात येते, ते लोक अशा शोषणाची मांडणी करू लागतात, पण हे प्रबोधन एकतर अतिसामान्यांपर्यंत पोचत नाही अथवा लोकांत पध्दतशीरपणे पसरवलेले पारंपरिक तथाकथित देवसंस्कार त्यांना लुबाडू वास्तवाची जाणीव होऊ देत नाहीत. यावर उपाय म्हणजे ज्यांचं थोडंफार वाचण्यापुरतं शिक्षण झालं आहे, त्यांनी जास्तीतजास्त वास्तविक वाचन करून आधी स्थानिक आणि नंतर सर्वदूरची मानवी लोकसंस्कृती नीट समजून घ्यावी, एवढीच अपेक्षा तटस्थतेनं करता येते. कारण जो लोकसंस्कृतीत मुरतो तो स्थानिक भाषेत रमतो. या पार्श्वभूमीवर आजच्या अहिराणी लोकसंस्कृतीचं मूळ अभिरांच्या ऐतिहासिक सत्यतेनुसारचं दर्शन रूंद होत जातं. म्हणून लोकसंस्कृतीचा विचार करताना, लोकसंस्कृतीत अनुस्युत असलेल्या बाबी व्यापक अंगानं समजून घेतल्या पाहिजेत. यात कालबाह्य ठरू पाहणाऱ्या आजच्या धंदेवाईक धार्मिक संकल्पना दूर ठेवणं, एखाद्या विशिष्ट उच्च वर्गाचं प्राबल्य निर्माण करण्याचं कारस्थान व त्यांचं वर्चस्व झुगारुन देणं, अंधश्रध्दांचं कवच दूर सारत खरी आदिम- आर्ष लोकसंस्कृती जतन करणं, देवभोळेपणा सोडणं, बाबा-बुवा संस्कृतीकडं पाठ फिरवणं, चुकीचं दान ओळखणं, आपली मूळ लोकसंस्कृती बळकवणाऱ्यांवर प्रहार करत सर्वसामान्यांना यातून जागं करणं, त्यांचं प्रबोधन करणं आदींसहीत इथल्या- खास अहिराणी पट्ट्यातल्या मानवी मूलभूत जिनसा, आपल्याला या समृध्द लोकसंस्कृतीत यापुढं पुढच्या पिढीसाठी जतन करून ठेवायच्या आहेत. आजूबाजूचा समाज आपल्या मुठीत ठेऊ पाहणारे धर्म-वर्चस्ववादी लोक नेमकं याविरूध्द वागतात. ते स्थानिक लोकसंस्कृतीला विरोध करणारे असतात. त्यांना सर्वदूर आपलं प्राबल्य प्रस्थापित करायचं असल्यानं विविध लोकसंस्कृती, सांस्कृतिक विविधता, बहुभाषा, प्रांतियभाषा, बोलीभाषा, स्थानिक महात्म्य आदींना अशांचा सुप्त विरोध असतो. अस्तित्वात असलेल्या सगळ्याच विविध जीवन जाणिवांचे लोक त्यांना आपल्या कह्यात आणायचे असतात. अशा घटनांतून स्थानिक लोकसंस्कृतीचं सपाटीकरण सुरू होतं. म्हणून बहुजनांचे हित डोळ्याआड करणं, बहुजनांच्या भाषेला कमी लेखत आपली भाषा पेरणं, बहुजनांच्या लोकपरंपरा बाजूला सारत मुख्य धारेतल्या लोकपरंपरांचा उदोउदो करणं, बहुजनांच्या लोकदैवतांना हीन समजणं, प्रत्येक बाबतीत पुरोहिताकडून पूजा आवश्यक करणं, बाबा वाक्य प्रमाण मानणं आदी बाबी अहिराणी लोकसंस्कृतीसह सर्वदूरच्या बहुजन लोकसंस्कृतीला सुरूंग लावणाऱ्या आहेत. या व्यतिरिक्त अहिराणीसह सर्वच लोकभाषेतील दुर्मीळ शब्द, वाक्प्रचार, उखाणे, म्हणी, ओव्या, विधी, लोककथा, लोकगीते, लोकवाद्य, लोकनाच इत्यादी पारंपरिक बाबीही अपेक्षित असल्या तरी फक्त याच गोष्टींना आपण लोकसंस्कृती म्हणू लागलो आहोत. पण आपण जे समजतो ते लोकसंस्कृतीचे काही घटक आहेत, पूर्ण लोकसंस्कृती नाही. स्थानिक लोकसंस्कृतीतून स्थानिक भाषा जन्म घेते, दुसऱ्या भाषेच्या उदरातून भाषेचा जन्म होत नाही अथवा एखाद्या भाषेचं अशुध्द- अशिष्ट रूप म्हणजे एखादी बोली, असं म्हणणं चूक आहे. अहिराणीसह सर्वच बोलीभाषा अशाच स्वयंभू आहेत. म्हणून अहिराणीसह विविध लोकसंस्कृतीतील मुळातली चौडी व्यापकता सगळ्याच अभ्यासकांनी समजून घेणं आवश्यक ठरतं. भारतीय विविध प्रांतातील सर्वदूर असलेल्या अनेक स्थानिक लोकसंस्कृतींचा मागोवा घेत अभ्यास केला तर इतक्या प्रचंड विविधतेतील एकताही सहज लक्षात येते. अनेक तारा कुठं कुठं जुळताना दिसतात. आपल्याकडील अमूक लोकसंस्कृतीचा घटक, तिथल्या अमूक विधीशी जवळचा वाटू लागतो. म्हणून ज्यांना आपली स्वत:ची लोकसंस्कृती कळत नाही, ते स्वत:च्या परिवेशातही उपरे ठरतात आणि मूळ उपऱ्यांची गुलामगिरी करत राहतात! ह्या लोकसंस्कृतीच्या विविधतेचं सपाटीकरण होऊ न देता विविधतेची व्यापक लोकसंस्कृती जशीच्यातशी जपली पाहिजे. (उदाहरणार्थ, महाराष्ट्रात मराठीसह सर्व बोली जिवंत ठेवल्या पाहिजेत). अशा लोकसंस्कृतीतूनच स्थानिक बोलीभाषांचा नैसर्गिक प्रवाह खळाळत असतो. ('काव्याग्रह', दिवाळी- भाषा विशेषांक २०२५ मधील 'अहिराणी, एकूण बोली आणि मराठी' या प्रकाशित दीर्घ लेखातील 'अहिराणीसह बोली परिवेशांची लोकसंस्कृती' हा तिसरा आणि शेवटचा भाग. इतरत्र वापर करताना लेखकाच्या नावासह ब्लॉगचा संदर्भ द्यावा ही विनंती.)

**डॉ. सुधीर राजाराम देवरे**
**ब्लॉगचा http://sudhirdeore29.blogspot.com/**

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०२ फेब्रुवारी २०२६





"ससोबाची सभा" हा कवयित्री ज्योती सोनवणे यांचा "सोहम प्रकाशन" छत्रपती संभाजीनगर येथून सन २०२४ मध्ये बालकविता संग्रह प्रकाशित झाला असून यात बालकांचे भावविश्व साकारण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येतो.मुळात या कवितासंग्रहाच्याद्वारे बालमनाला पडलेले प्रश्न सोडवणे, शहरातील मुलांना पशुपक्षी, प्राणी, निसर्ग ,खुले आकाश या गोष्टी दाखवणे. या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव करून देणे आणि बालकांच्या मनोरंजना बरोबरच त्यांना संस्कार देणे हा या कवितासंग्रहाचा उद्देश आहे असे कवयित्री ज्योती सोनवणे आपल्या मनोगतात उल्लेख करतात.साहित्य नेमकं कशासाठी?कलेसाठी की जीवनासाठी? या पेचात न अडकता, फक्त स्वांत:सुखाय न लिहिता कवी अन् शिक्षक म्हणून आपण समाजाचं काहीतरी देणं लागतो अन् हे देणं फेडण्याचा हा मनापासून केलेला प्रयत्न आहे असे मला वाटते . कारण कवयित्री स्वतः शिक्षिका आहे.किल्ले रायगड या सलामीच्या पहिल्याच कवितेत त्या म्हणतात,"सिंहासनावर आरुढ राजे दाखवायचे आहेत तुम्हाला डोळे भरुनी पाहून येऊ हिरकणीच्या प्रतापाला"इथे फक्त रायगड किल्ला दाखवणे हा उद्देश नसून हिरकणी सारख्या सामान्य म्हणून जन्मलेल्या असामान्य मातांच्या साहस अन् पराक्रमाचा दैदिप्यमान इतिहासाची ओळख करून देणे हा आहे.तर "चल चल मित्रा" या कवितेत जंगलातील हरीण काळवीट जिराफ हत्ती माकड वाघोबा उंट गेंडा अस्वल या सर्व प्राण्यांची ओळख करून दिली आहे."बेडूकदादा" या कवितेत.."बेडूकदादा बेडूकदादा डराव डराव डराव उन्हाळी सुट्टीत तुम्ही कुठे गायब होता राव?"पावसाळ्यात तुमचा असतो का जागर?तेव्हा मात्र असतातुम्ही सर्वजण हजर."वरील ओळी वाचल्या अन् मी बालपणाच्या पावसाळ्यात जाऊन पोहोचलो. रात्रभर पाऊस पडल्याने सकाळी उठून बघतो तर काय बेडकांची डराव डराव सुरू व्हायची हे बेडकं आली कुठून हा प्रश्न उपस्थित व्हायचा.. आणि याच प्रसंगावर ही रचना वाचून खरंच खूप आनंद झाला. "नंदीबैल" या कवितेत कवयित्री नंदीबैलाला उद्देशून म्हणतात की,"पाऊस पडेल नाही पडेल तुला काहीच माहिती नसते मालक मारेल तुला म्हणून तू डोकं हलवतो नुसते कुंकू लावणे पाया पडणे तुला मुळीच आवडत नाही परावलंबी जीवन म्हणून तू काहीच करू शकत नाही."या रचनेत नंदीबैलाची व्यथा मांडलेली दिसून येते त्याच्या कपाळाला कुंकू लावणे त्याच्या पाया पडणे त्याला पाऊस पडेल की नाही पडेल हे विचारणे आणि त्याचे फक्त डोके हलवणे यावर खरंच प्रत्येकाने विचार करायला पाहिजे कारण पाऊस पडणे किंवा न पडणे हे नंदीबैलाच्या हातात नसून त्यासाठी माणसाने वृक्ष लागवड केली पाहिजे झाडाचे तोडणे थांबवले पाहिजे असे वाटते. म्हणून तर "एक झाड लावू"या कवितेत.."दादा दादा एक झाड आपण लावू रोज रोज पाणी त्याला देत जाऊ पशुपक्षी सारेच होतील मग आनंदी पर्यावरण रक्षणाची दादा घेऊ रे हे संधी ."अशा आशयाची कविता सहज लिहिली जाते.आजच्या काळात खऱ्या अर्थाने लेकरांचे बालपण हरवले आहे. केजी पासून पीजी पर्यंत फक्त पुस्तक एके पुस्तक असा प्रवास चालू आहे. लेकराचे खेळण्या बागडण्याची वय निघून चालले आहे परंतु त्याला कोणी खेळू देत नाही या परिस्थितीवर लिहिताना'नको ना रागावू आई' या कवितेत.."नको ना ग आई असे मला सारखे रागावू लहान सहान चुकांना नको ना असा धाक लावू""लहान आहे मी अजून करू दे ना, थोडी मस्ती मी खेळायचे म्हटले की तुझी कटकट सुरू नुसती."असे भावविश्व मांडताना शाळेतील फळ्याचे महत्त्व कवयित्री सांगायला विसरत नाही. म्हणून " फळा' या कवितेत.."काळा काळा फळाबोलतो मला फार रोज शिकवतो आम्हाला एक दोन तीन चार" "खरे सांगू फळ्या दादा तू असला तरी काळा ज्ञानाचा सागर करतोस डोक्यात आमच्या गोळा." यात ज्ञान देणाऱ्या फळ्याविषयी आणि शिक्षकांविषयी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यात आला असून पुढील "चल चल मैने" या कवितेत.."शिकून सवरून मिळवू खूप ज्ञान वाटावा आई बाबासह देशाला ही अभिमान."नेमकं शिकायचं कशासाठी या प्रश्नाचे उत्तर या चार ओळीत दिलेलं आहे की शिक्षण म्हणजे फक्त नोकरी मिळवणे किंवा व्यवसाय करणं नसून आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून आपल्या आई-वडिलांना आणि आपल्या देशालाही अभिमान वाटावा असं काहीतरी करून जाणं आणि त्यासाठी शिकणं ही सुंदर संकल्पना या कवितेत मांडण्यात आलेली आहे. तर पुढील "माझी शाळा" या कवितेत.."प्रेमळ असावेत गुरुजी आईसारख्याच बाई शाळेतून घरी येण्याची होऊ नये कुणालाच घाई"."हसत खेळत मला सर्व ज्ञान मिळत जावेघरी येताना माझे पाऊल जड व्हावे."असे सांगताना शिक्षण व्यवस्थेवर खऱ्या अर्थाने बोट ठेवण्याचे काम कवयित्री करते अजून तो दिवस खूप दूर आहे की ज्या दिवशी मुलं शाळेत आनंदाने जातील आणि शाळेतून घरी येताना त्यांना घरी येणं नकोसं वाटेल आणि ज्या दिवशी असं होईल त्या दिवशी खऱ्या अर्थाने शाळा, गुरुजी अन् समस्त शिक्षण व्यवस्थेचे हे यश असेल असे मला वाटते.या संग्रहात सर्वच कविता लेकरांचे भविष्य उजागर करताना त्यांना संस्कार देण्याचे त्यांचे मनोरंजन करण्याचे काम करताना दिसून येते. ' चिऊताई ','एक झाड लावू',' घासातला घास' ' गणिताचा अभ्यास' ' शाळेचा लळा' ' ' दप्तराची ओझे' अशा अनेक महत्त्वाच्या कविता यात दिसून येतात. कवयित्री श्रीमती ज्योती सोनवणे यांना पुढील साहित्यिक प्रवासासाठी तिफण कन्नड तालुका साहित्य परिवाराच्या वतीने मन:पूर्वक शुभेच्छा!

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

# युजीसी इक्विटी बिलाच्या स्थगितीच्या विरोधात आंबेडकरी संघटनांचे आंदोलन







**छ. संभाजीनगर** : दि. 01 शैक्षणिक क्षेत्रातील जात, धर्म, भाषा, लिंग आधारित भेदभावाला प्रतिबंध करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रस्तावित केलेल्या युजीसी इक्विटी रेग्युलेशन या नियमावलीला सवर्ण समाजाच्या विरोधावरून मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने देशभरात संतापाची लाट उसळली असून आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट येथे विविध आंबेडकरी पक्ष संघटनांनी जोरदार आंदोलन करून या स्थगितीचा निषेध नोंदविला.यावेळी नवीन नियमावली तात्काळ बनविण्यात येऊन लागू करावी, तिला अधिक सशक्त व सर्वसमावेशक बनवावे तसेच समताविरोधी उच्चवर्णीय गटाचा दबाव झुगारून न्यायालयाने निष्पक्ष पणे न्याय करावा अशी मागणी करून “भेदभावमुक्त शिक्षण हा आमचा हक्क आहे”, “UGC समता नियमावली तात्काळ लागू करा”, “जातीय भेदभाव थांबवा” अशा जोरदार घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.यावेळी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना उच्च शिक्षण संस्थांमधील जातीय भेदभाव, संस्थात्मक छळ आणि मानसिक अत्याचार ही गंभीर व वास्तव समस्या असून रोहित वेमुला व डॉ. पायल तडवी यांसारख्या घटना त्याचे जिवंत पुरावे आहेत. प्रवेश प्रक्रिया, मूल्यमापन, संशोधन मार्गदर्शन, फेलोशिप वितरण, प्रशासकीय निर्णय व शिस्तभंग कारवाईपर्यंत भेदभाव खोलवर रुजलेला आहे. अशा परिस्थितीत समतेवर आधारित बंधनकारक नियमावली ही काळाची गरज असताना या नियमावलीला स्थगिती आणि काही उच्चवर्णीय गटांकडून होणाऱ्या विरोधाचा तीव्र निषेध केला. समतेच्या मागणीला “जातिवाद” ठरवत कोर्टाने केलेला हा अन्याय असल्याचे सांगत याविरोधात तीव्र संघर्ष करण्याचा सर्वांनी निर्धार केला. प्राचार्य सुनील वाकेकर, डॉ.शंकर अंभोरे,दौलतराव मोरे, डॉ.अनिल पांडे, सचिन निकम, डॉ.दीपक खिल्लारे, अरविंद कांबळे, चंद्रकांत रुपेकर,मिलिंद मोकळे, राहुल वडमारे, प्रा.सिद्धोधन मोरे, प्रा.देवानंद पवार,राष्ट्रपाल गवई, प्रा.सागर गायकवाड, राहुल गवळी, प्रवीण शिंदे, बाळू वाघमारे, मधुकर मघाडे, ॲड.रुपराव खंदारे, शैलेंद्र मिसाळ, सुशील भिसे, प्रा.प्रबोधन बनसोडे, कुणाल भालेराव, किरण मगरे, यश रोकडे, प्रशांत बोराडे, संदिप तुपसमुद्रे, भीमराव वाघमारे, लोकेश कांबळे, तेजल पालवे, रितेश अंभोरे, शुभम उबाळे, प्रतीक चौरे, प्रेम चौरे, राज चौरे, आकाश सुरवसे, अमोल चौरे,विजय शिनगारे, अनामि मोरे, शेख हकीम, नवाब पटेल, मंगेश कांबळे, त्रिशरण गायकवाड, शुभम नवगिरे, सचिन वाहुळे,बालाजी सोनवणे, रत्नदीप रगडे, सुमेध नरवडे, मंथन गजहंस, यश गजभिये, सिद्धार्थ दिवेकर, प्रमोद थोरात, अनिल जाधव, डॉ.प्रकाश गायकवाड, सुमित खिल्लारे, सिद्धार्थ केदारे, आनंद केदारे, पोपट मुगदल, ॲड.अशोक उके, गौतम खरात, सचिन चौथमल, राजू बनकर, मधुकर उमप, सुशील भिसे, जय कांबळे, प्रवीण कांबळे, सम्यक त्रिभुवन, यश माने, आशिष गर्जे, ऋषिकेश कारके, अतुल चव्हाण, अतुल ढगे, प्रवीण वाव्हळ, सिद्धार्थ इंगळे, अंकेश वाव्हळ, अँड.सुशील पाईकराव, समाधान सावंत, शैलेश खंदारे, बाळू गायकवाड, विजय उमाळे, प्रदीप तेलंग, प्रकाश ढाले, अविनाश यादव, जीवन गायकवाड, सोहेल अन्सारी, काझी फराज आदींसह रिपब्लिकन सेना, रिपब्लिकन विद्यार्थी सेना, बीआरएसपी,महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष, सेक्युलर रिपब्लिकन फेडरेशन, सम्यक विद्यार्थी आंदोलन, SFI, भारतीय विद्यार्थी मोर्चा, आईस्का, बहुजन विद्यार्थी आघाडी, स्वाभिमानी मुप्टा, कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, भीमआर्मी, , भारतीय क्रांती दल, वेल्फेअर पार्टी ऑफ इंडिया आदि संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०२ फेब्रुवारी २०२६

# श्रमदानातून सामाजिक विकास काळाच्या आड जाताना

श्रमदान भारतीय संस्कृतीतला एकोप्याचा,समाजाच्या विकासाचा, संघटितपणाचा सौंधार्याचा ठेवा होता.आणि यांसच श्रमदान हे सर्वश्रेष्ठ दान म्हटलं जायचं. आपण श्रमदानाच्या अनेक आख्यायिका पाहिल्यात, ऐकल्याही आहेत.म्हणे हे मंदिर रातोरात बांधलं आहे.ही वास्तू राक्षसांनी एका रात्रीत बांधली आहे. हे मंदिर पाची पांडवांनी एका दिवसात बांधलं आहे.म्हणजे त्या काळी श्रमदान करणारी संस्कृती, समाज आणि विचार होता.कोणतंही सामाजिक कार्य हे सर्वांच्या सहभागातून व्हायचं. तेथे रोजगार, जेवण,मजुरी हा प्रकार कदापिही नव्हता.ती समूहाची गरज, समूहाचा निर्णय म्हणून त्याची शंभर टक्के अंमलबजावणी व्हायची. म्हणून हजारो वर्षापासून भारतीय संस्कृतीतला श्रमदानाचा ठेवा जतन केल्याचे,संगोपन केल्याचे, संरक्षण केल्याचे दिसते आहे.म्हणून प्रार्थना स्थळे,गड किल्ले, मोठमोठ्या वास्तु,लेण्या,गडी,वाडे अशा अनेक वास्तू आज अभेद्य म्हणून आपणास पाहावयास मिळतात.एखादा निर्णय झाला की तो समूह एकत्र यायचा.आणि माझं म्हणून कष्ट करायचा. जीव लावायचा. प्राण ओतायचा.लोकांच्या सहभागातून बांधलेल्या हजारो वर्षाच्या वास्तू सुद्धा आज अजरामर झालेल्या आहेत.आणि त्या आपनास आजही पहावयास मिळतात.गेल्या शंभर वर्षाचा जरी आपण विचार केला तर आपणास असे दिसते की शेताकडे जाणारे रस्ते,गावातली प्रार्थना स्थळे,किंवा धर्मस्थळे,चावड्या,शाळा ज्या ज्या सामूहिक उपयोगाच्या वास्तु त्या सर्व लोक एकत्र येऊन बांधायचे. त्याची सजावट करायचे. त्याचं संरक्षण करायचे.त्या सर्व वास्तू ह्या माझ्या गावच्या वाटायच्या आणि त्याचं तेवढ्याच सकारात्मक भावनेने जतनही केलं जायचं. त्याचं पावित्र्यही टिकविलं जायचं. त्या सोबत गावातील रस्ते, वृक्ष लागवड, पाणवटे, विहिरी,बारवा,शाळा,चावड्या हे सर्व समूहाने एकत्र येऊन ते तयार केलं. जायचं आणि त्याचं जतनही केलं जायचं.ती त्या काळाची गरज होती.सरकार नावाचं कुठलंही पात्र तुमच्यासमोर उभा नव्हतं. देशाला स्वातंत्र्य मिळालं.मग देश चालवायचा झाला तर टॅक्स हवा. मग त्याची पद्धत सुरू झाली. जमा झालेल्या टॅक्सच्या माध्यमातून गाव विकासाला मदतीचं स्त्रोत उभ राहिलं.खरा विचार केला तर लोकांनी वर्गणी जमा करून बांधलेली वास्तू आणि सरकारनी लोकांच्याकडून पैसे घेऊन केलेली मदत ही सारखीच आहे की नाही.कोणताही विरोधाभास असण्याचे कारण नाही.. यातून काय घडलं तर हे सगळं सरकारने करावं. ती सरकारची जबाबदारी आहे अशी भावना लोकांच्या मनामध्ये निर्माण झाली.आणि गावाचं गावपण, गावाचा येकोपा, सामूहिक उपयोगाची साधने, प्रार्थनास्थळे, शाळा, पानवटे, विहिरी,बारवा हे सर्व सर्वांच्याच गरजेचं असून सुद्धा लोकांचे त्याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते आहे. तरीही लोक त्याच्या देखभाल आणि दुरुस्तीकडे आता कोणीही पाहायला तयार नाही.मग हे कोणी करावं? तर ते सरकारने करावं.आमदार खासदाराने करावं. आपण मात्र फक्त भांडत राहावं. बघ्याची भूमिका घ्यावी.उदाहरणार्थ पहायचं झाल्यास कधी कधी प्रचंड मोठा दुष्काळ पडतो. गावाला पाणी मिळत नाही.सगळ्यांची तडफड होते. प्रत्येक जण आपापल्या पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी धावतो. परंतु सर्व गाव एकत्रित येऊन एखादा पानवाठा दुरुस्त करायला पाहिजे अशी कोणाच्याच मनात इच्छा होत नाही. चर्चा होत नाही. आणि समूहाने निर्णय घेण्याचा तर विषयच उरत नाही. मग मोर्चे, आंदोलने, निघतात. घेराव घातले जातात.मंत्र्याच्या गाड्या अडवल्या जातात.रस्ते अडवले जातात. जमल्यास राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान जाळपोळ केली जाते. खऱ्या अर्थाने जे करायला हवं ते न करता राष्ट्राच्या नुकसानीचं कार्य तत्परतेणे केले जाते. आणि जे तातडीने समूहाने करायची आवश्यकता आहे,त्याकडे दुर्लक्ष केले जाते.आणि लोक सरकारवरती विसंबून राहतात. यातून श्रमदान नावाचा विषय बाजूला सारून विषयाचं राजकारण केलं जातं.यास फक्त समाजच कारणीभूत नाही तर सरकार आणि निवडून गेलेले लोक हे मूळ कारणीभूत आहेत.घोषणांचा बाजार मांडून माणसांना आळशी बनवलं गेलं.लोक सरकारवर विसंबून राहायला लागले.यातून गावाचं सौभाग्य,गावाच्या वास्तु, या दुरापास्त होऊन गेलेल्या दिसतात.गावांच्या गरजा ह्या सरकारवर आणि निवडून दिलेल्या लोकांच्या अंगावरती फेकून देऊन लोक निर्धारस्त झाल्याचे चित्र दिसत आहे. एका बाजूला प्रचंड भ्रष्टाचार सुरु आहे. विकास कामातला पैसा हा वाटण्या करण्यात संपून जातो.राजीव गांधी पूर्वी आपल्या भाषणात म्हणायचे १००% विकासावरती आलेला निधी तो ७०% वाटण्यात जातो. आणि ३० टक्के रक्कम प्रत्यक्षात विकासावरती खर्च होते. हा एवढा मोठा भ्रष्टाचार निपटणे ही काळाची गरज आहे. परंतु तसे होताना आता देशात दिसत नाही. निवडून यायचं आणि देशाला लुटायचं एवढाच विचार आता राजशक्तीमध्ये नशा यावी असा भिंगत गेल्याचे दिसते आहे.आणि यातूनच खऱ्या अर्थाने विकासाची अधोगती निर्माण झालेल्या आहेत. एका बाजूला लोकसहभाग बंद झाला. सामूहिक कृती बंद झाली. सामूहिक गरजा पूर्ण करण्यासाठी लोकांचं श्रमदान बंद झालं.आणि दुसऱ्या बाजूला पैसा गावापर्यंत पोहोचत नाही लं.गावाच्या समाजाच्या विकासाला खिळ बसली. आजच्या कार्यकालाचा विचार केला तर श्रमदान नावाचा शब्द काळाच्या ओघात मागे केव्हाच निघून गेला हे आज कोणालाही आठवत नाही.रस्त्यावर खड्डे पडतात.गतिरोधक मात्र मजबूत दिसतात.नाल्या ब्लॉक होतात. दुर्गंधी सुटते.जुन्या शाळा,जुनी प्रार्थना स्थळे उध्वस्त झालेली आहेत. त्याकडे कोणाचही लक्ष लागल्याचं दिसत नाही. ज्या शाळेतून आपण क्लासवन, क्लास टू अधिकारी बनलो, माणूस बनलो, त्या शाळा उध्वस्त झालेल्या आहेत. त्याच्या विकासावरती एकही रुपया समूहातून एकत्रित केला जात नाही. हे या देशाच्या अधोगतीचे लक्षणच आहे,असेच म्हणावे लागेल.तर दुसरीकडे लक्ष वेधत असताना ज्या शिक्षणातून देश सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आणि आर्थिक विकासाकडे वळतो त्याचं मुख्य केंद्र आहे शिक्षण.ते मागे पडताना दिसत आहे. आणि धार्मिक स्थळांच्याकडे लोकांचा कल मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसतो आहे. आणि तीही प्रार्थना स्थळे ही सुरक्षित दिसत नाहीत.जातीत, धर्मात तान तनाव होताना दिसतो आहे. खऱ्या अर्थाने श्रमदानातून शाळा उभ्या राहिल्या पाहिजेत. श्रमदानातून अभ्यासिका उभ्या राहिल्या पाहिजेत लं.ते आज होताना दिसत नाही. तर सोन्याची प्रार्थनास्थळे उभी राहताना दिसतात. लोक लोकांच्या गरजा या राजसत्तेकडे मागणी घालायच्या ऐवजी प्रार्थनास्थळे बांधण्याच्याकडे लोकांचा कल जास्त दिसून येतो आहे. हे बदलण्याची आवश्यकता आहे. समाजामध्ये प्रचंड मोठी वृक्षतोड झालेली आहे.ते पुन्हा लावणे, त्याचं संवर्धन करणे, रस्ते नाल्या सामूहिक विकासाची कामे, जलस्त्रोत वाढविणे, संवर्धन करणे ही लोकांच्या श्रमदानावरती व्हायला हवीत.कारण तिथे प्रत्येक माणसाचं श्रमाअर्पण झालेलं असतं. ते मजबूत असतं.आणि त्यातूनच एकोपा समाजासमोर ठेवण्यासाठी आदर्श विचार,आदर्श कृती म्हणून ती समाजासमोर उभी राहते. गरज आहे समूहाने कृती करण्याची.गरज आहे वृक्ष संवर्धन करण्याची.गरज आहे परिपूर्ण गावच्या सहभागातून गावच्या विकासाची.याच्यासाठी प्रत्येक गावाने पुन्हा एकदा नव्याने एकोप्याने,संघटितपणे, सर्वांच्या मदतीतून नवविश्व साकारण्याची.येणारा काळ कोणता विचार येऊन पुढे जाईल हे मात्र डोळसमनाने पाहण्याची आवश्यकता आहे.आपण फक्त बघ्याची भूमिका घेतली तर समाज असाच वाहत जाणार आहे. विकासाच्या टप्प्यावरती प्रत्येकाला त्याच्या झळा सोसाव्या लागतील आणि तसे होणे देशाच्या राष्ट्राच्या हिताचं होणार नाही.चला तर येणारा नवाकाळ २२ व्या शतकाकडे जाताना समाज,राष्ट्रीय ऐक्य,सर्व धर्म समभाव आणी मानवी मूल्य घेऊन चालत राहणारा निर्माण होईल काय पहायला तर आपल्यालाच लागणार आहे.



लेखक :भूमिपुत्र वाघ.

## लक्ष्मीबाई सौंगडे यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर : सतपालनगर, पहाडसिंगपूरा येथील रहिवासी लक्ष्मीबाई वामनराव सौंगडे यांचे आज दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी हृदयविकाराने दु:खद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बेगमपूरा स्मशानभूमी येथे होणार आहे. त्यांच्या पाश्चात्य एक मुलगा, सून, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. लक्ष्मीबाई सौंगडे या कास्ता माध्यमिक विद्यालयाचे कर्मचारी गौतम सौंगडे यांच्या मातोश्री होत्या.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०२ फेब्रुवारी २०२६


## ६ फेब्रुवारी रोजी मुक्त विद्यापीठाचा रोजगार मेळावा : २००० पदांसाठी २५ कंपन्यांचा सहभाग

**छत्रपती संभाजीनगर :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्र, सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय आणि युवाशक्ती फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बेरोजगार तरूणांसाठी ६ फेब्रुवारी २०२६ शुक्रवार रोजी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या महाविद्यालयात सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत चालणाऱ्या या रोजगार मेळाव्यात जवळपास २५ आंतरराष्ट्रीय कंपन्या सहभागी होणार असून २००० जागांसाठी मुलाखती घेणार आहेत. या रोजगार मेळाव्यात मराठवाड्यातील कोणत्याही विद्यापीठातून कोणत्याही शाखेत पदवीधर असलेले तसेच दहावी-बारावी पास नापास आणि आय.टी.आय. सर्व ट्रेड, डिप्लोमा आणि इंजिनिअर पदवीधारक (सर्व शाखा) हे सहभागी होऊ शकतात.

या संधीचा लाभ घेण्यासाठी व अधिक माहितीसाठी ९६०७९६५७४२/ ९०२८१९२२८८/ ७०५७४६०३३१ या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करावी. ही नोंदणी विनामूल्य आहे असे आवाहन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्राचे संचालक डॉ. नंदकुमार राठी यांनी केले आहे.

## आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा पदभार डॉ. संजीव सोनवणे यांच्याकडे



**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरुपदाच्या रिक्त जागेचा पदभार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु प्रोफेसर डॉ. संजीव सोनवणे यांच्या कडे देण्यात आला आहे.

विद्यापीठाचे कुलपती तथा महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, प्रोफेसर डॉ. संजीव सोनवणे यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कार्यभारासोबतच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या रिक्त असलेल्या कुलगुरु पदाचे ही अतिरिक्त पदभार दि. ०१ फेब्रुवारी २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत स्वीकारावे.

डॉ. संजीव सोनवणे हे यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे शिक्षणशास्त्र विभाग तसेच मुक्त शिक्षण विभागाचे विभागप्रमुख, अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषद सदस्य , तसेच परिक्षा नियंत्रक, प्रभारी कुलसचिव, प्र - कुलगुरु आदी महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. डॉ. संजीव सोनवणे यांनी १८ पुस्तकांचे लेखन केले असून त्यांचे विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे आणि नियत कालिकांमधून ६७ शोध निबंध प्रकाशित आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ३८ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. तर २४ विद्यार्थ्यांनी एम. फील पदवी प्राप्त केली आहे. या बरोबरच डॉ. सोनवणे यांनी अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांमध्ये विविध पदांवर काम केले आहे.

## जि. प. प्रशाला वाळूजचे शालेय चित्रकला स्पर्धेत यश




**वाळूज :** गरवारे कम्युनिटी सेंटर केंद्र वाळूज, यांच्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या शालेय चित्रकला स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत जि. प. प्रशाला वाळूज उर्दू माध्यम च्या विद्यार्थिनीकु.पठाण मिसबा अजीज प्रथम पारितोषिक कु. शेख उमामा जाकीर द्वितीय, कु. सय्यद मसीरा मोईन तृतीय पारितोषिक मिळविला. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी आपली सर्जनशीलता, कल्पकता व कलात्मक कौशल्याचे अत्यंत उत्कृष्ट दर्शन घडविले. "स्वच्छ भारत" या मुख्य विषयाखाली विद्यार्थ्यांनी चित्रकलेतून स्वच्छ भारताचे दर्शन घडविले.यशस्वी विद्यार्थ्यांना गरवारे कम्युनिटी सेंटरचे संचालक श्री. सुनील सुतावणे यांच्या हस्ते पारितोषक देऊन गौरविण्यात आले. या प्रशालेचे विद्यार्थी शासकीय कला परीक्षा एलिमेंट्री व इंटरमिजिएट परीक्षेत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता व सर्व विद्यार्थी चांगल्या श्रेणीने उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांना जि. प. प्रशाला वाळूजचे मुख्याध्यापक श्री. सी.एनगवळी सर, खान गजाला मॅडम (प्रभारी मुख्याध्यापक, उर्दू माध्यम), सिद्दिकी आमेर सर, सय्यद बुशरा मॅडम इत्यादी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशालेतर्फे कौतुक करण्यात आले.





